• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२८ • गुरुवार,दि.२९ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 328 • Thursday 29 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# बीड शहरातून जाणाऱ्या रस्त्याचे होणार चौपदरीकरण -खा.प्रितम मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून रुंदीकरण आणि दुरुस्तीची मागणी होत असलेल्या बार्शी नाका ते शिवाजी चौक रस्त्याचे खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे भाग्य उजाळले आहे. शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग बार्शी नाक्यापासून शिवाजी चौकापर्यंत चौपदारी होणार असून याकामासाठी केंद्रीय रस्ते विकास मंत्रालयाने अठ्ठेचाळीस कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. बीड शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ एफ या रस्त्याची दुरुस्ती आणि रुंदीकरण करावे अशी मागणी बीडकरांकडून वारंवार करण्यात येत होती, या मागणीची दखल घेऊन खा.प्रितमताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सदरील रस्ता चौपदरी करण्यात यावा अशी मागणी केली होती, तसेच खा. मुंडे यांच्याकडून याकामी सातत्यपूर्ण पत्रव्यवहार देखील सुरु होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून बीडकरांची मागणी देखील पूर्ण




झाली आहे. खा. प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नांनी बार्शी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत चौपदरीकरण करण्यासाठी आवश्यक निधीला मंजुरी मिळाल्यामुळे लवकरच या कामासाठी निविदा मागवण्यात येणार आहेत. रहदारीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला हा मार्ग आता अडथळे मुक्त होणार आहे. यासंदर्भात माहिती देताना खा. प्रितमताई मुंडे म्हणाल्या कि बीड शहरातील नागरिकांच्या मागणीची दखल घेऊन बार्शी नाका-शिवाजी चौक रस्त्यासाठी केंद्रीय मंत्रालयाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भेटून या मार्गातील वाहतूक समस्येची माहिती आणि चौपदरीकरणाच महत्व मांडल होत, आपल्या जिल्ह्यातील शिवतीर्थाला जोडणारा हा रस्ता चौपदरी आणि दर्जेदार करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्र सरकार आणि नितीन गडकरी यांचे आभार अशा शब्दात खा. प्रितमताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करून केंद्र सरकारचे आभार मानले.

# कायदा सुव्यवस्था राखण्यात सरकार अपयशी -ठाकरे गट

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार माजला असून मुंबई, नवी मुंबईत कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले असून कायदा सुव्यवस्था राखण्यात या सरकारला अपयश आले आहे, अशी घणाघाती टीका ठाकरे गटाने केली. मुंबई, नवी मुंबईत दलालांचा सुळसुळाट असून हप्तेबाजीखोरांचे जाळ पसरले आहे. शेतकरी, बेरोजगार तरुणांना न्याय देण्यास हे सरकार असक्षम ठरले आहे. नवीन कायद्याबाबत माथाडी कामगार त्रस्त असून आशा सेविका मोबदल्यासाठी टाहो फोडत आहेत. गिरणी कामगार



घरासाठी आंदोलन करत असताना त्याकडे या सरकारचे लक्ष जात नाही. बेकायदेशीर काम व धनदांडगे व्यावसायिक यांच्या मागे हे सरकार उभे असून सर्वसामान्य जनतेला वाऱ्यावर सोडले, अशी आरोपांची मालिकाच यावेळी ठाकरे गटाने सरकारपुढे सुनावली. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २६० अनव्ये प्रस्तावावर बोलताना त्यांनी हा विरोध नोंदवला. राज्यात मंगळवारी रात्री १४ जिल्ह्यात मोठया प्रमाणात गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. मात्र २४ तास होत असतानाही सरकारने साधे पंचनामे करण्याचे आदेश दिले नाही. जवळपास ४६ हेक्टर जमिनीच नुकसान झालं आहे. सरकार नुसत्या घोषणा आणि घोषणा शिवाय काही करत नाही यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली आहे. शेतकऱ्यांची ज्या पद्धतीने अडवणूक पिळवणूक होत आहे ते पाहता दगडाला पाझर फुटेल अशी स्थिती आहे. स्वामिनाथन आयोगाने सुचवलेल्या कोणत्याही सूचनांचे पालन केले जात नाही. कापूस,सोयाबीन, धान, केळी व संत्रा पिकांचे नुकसान होत असताना सरकार शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे न्याय देऊ शकत नाही.

# सरकारसमोर मांडले पत्रकारांचे गंभीर प्रश्न

**मुंबई । वृत्तसेवा**

मंगळवारी राज्याचा अर्थसंकल्प सभागृहात सादर केल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री सर्वश्री फडणवीस विधान भवनातील पत्रकार कक्षात आले. पत्रकारांना माहिती देताना राज्यातील शेतकरी, , महिला, विद्यार्थी,युवक, मागासवर्गीय आदिवासी, उद्योजक, व्यापारी अशा सर्वच घटकांना न्याय आणि विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात केला आहे असे सांगताच क्षणी मंत्रालय वार्ताहर संघाचे सचिव प्रवीण पुरो व मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक यांनी अर्थसंकल्पात पत्रकारांबाबत आपण काहीच निर्णय घेतलेला नाही. पत्रकारांच्या सन्मान (पेन्शन) व वैद्यकीय निधी या दोन योजनेअंतर्गत फंडाची रक्कम वाढवावी. तसेच निकष किचकट आहेत त्यामुळे ज्येष्ठ पत्रकार लाभ घेण्यापासून वंचित राहिले आहेत. ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान योजनेच्या प्रलंबित अर्जाविषयी विचारणा केली की, निधी अपूरा असल्याचे कारण पुढे केले जाते. यावर किरण नाईक यांनी पत्रकारांना द्यावयाची वैद्यकीय मदत आणि सन्मान (पेन्शन) योजना या दोन वेगळ्या योजना असल्यामुळे वित्त विभागाला सांगून दोन योजनांसाठी वेगळे हेड तयार करून प्रत्येक हेडमध्ये रू. १०० कोटीची तरतूद केल्यास तक्रार न येता प्रश्न मार्गी लागेल याबाबी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्याच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच पत्रकारांवरील वाढते हल्ले रोखण्यासाठी सरकारने संरक्षण कायदा केला परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबतचे गृहविभागाने नोटिफिकेशन काढलेले नाही त्यामुळे न्यायालयात चार्जशीट दाखल करताना पोलीस कायद्यातील कलम काढून टाकतात ही बाब उपमुख्यमंत्री फडणवीस हे गृहमंत्री असल्यामुळे किरण नाईक यांनी त्यांच्या नजरेस आणून दिली.

# चोरटा पोलिसांनी मुद्देमालासह पकडला

**बीड । प्रतिनीधी**

जानेवारी महिन्यात सुभाष रोडवरील आर के मेन्स वेअर या कपड्याच्या दुकानातून चार लाख रुपये किमतीचे रेडीमेड कपडे चोरी गेल्याची माहिती मिळाली होती. या संदर्भात दुकान चे मालक श्री राहुल कदम राहणार घोसापुरी यांनी तक्रार पोलीस ठाणे बीड शहर येथे दाखल झाली होती. पोलीसांनी यात तात्काळ या संदर्भात माहिती घेण्यास सुरुवात केली असतां माहिती मिळाली की दररोज



दोन ते चार ड्रेस दुकानातून चोरी जात असे. सीसीटीव्ही फुटेज वरून यातील चोरट्यांची माहिती मिळाली. खरेदी करण्याच्या बहाण्याने तो येत असे. परंतु दरम्यान यातील चोरटा यास त्याची चोरी उघड झाली आहे ही माहिती मिळाल्या नंतर हा फरार आला होता आणि गेल्या दोन महिन्यांपासून पोलीसांना गुंगारा देत होता. परंतु परवा सायंकाळी तो पुन्हा अशी चोरी करण्यासाठी कालिका नगर मध्ये फिरत आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाली यावरून तेथील एमएससीबीचे ऑफिसच्या पाठीमागून तो संशयास्पद फिरत असताना अटक करण्यात आली. अटक केलेल्या इसमाचे नाव गणेश अर्जुन परळकर राहणार केतुरा, तालुका बीड असे आहे.

# परळीत दुकानाला भीषण आगीत

**परळी । प्रतिनिधी**

शहरातील स्वामी विवेकानंद नगर भागातील शिरीष सलगरे यांच्या पत्र्याच्या शटर च्या दुकानातील सहित्यास व लगतच्या लॉन्ड्री व फेट्याच्या दुकानास मंगळवारी रात्री अचानक आग लागण्याची घटना घडली आहे. या आगीत दोन्ही दुकानातील साहित्य जळून खाक झाले आहे. रात्री उशिरा सव्वा बारा वाजता ही आग नगरपालिकेच्या अग्निशामक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न करून आटोक्यात आणली. आगीचे कारण मात्र स्पष्ट झाले नाही. या आगीत शिरीष सलगरे यांचे ४ लाख रुपये किमतीचे साहित्य व अर्जुन बुंदीले यांचे ५ लाख रुपयाचे लग्नातील फेटे व कपडे व इतर साहित्य जळाले आहे. येथील विवेकानंद नगर भागात श्री शिरीष सलगरे हे राहतात. त्यांच्या घरासमोरच त्यांचे पत्राची चार दुकाने आहेत या चार दुकानापैकी एका दुकानात अर्जुन बुदिले यांचे तुळजाभवानी फेटेवाले हे भाड्याने लॉन्ड्री सेंटर व फेट्याचे दुकान आहे. या दुकानात फेटे व लॉन्ड्री चे कपडे होते. तर शिरीष सलगरे यांचे दुकानात घरगुती वापराचे साहित्य होते हे साहित्य मंगळवारी रात्री लागलेल्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. रात्री साडेआठ वाजता अर्जुन बुंदिले ते नेहमीप्रमाणे आपले दुकान बंद करून घरी गेले होते. रात्री साडेनऊच्या सुमारास या दुकानातून अचानक धुरांचा लोट बाहेर आले. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले.

# केजमधील रस्ते विकासासाठी 35 कोटींचा निधी मंजूर -आ.नमिता मुंदडा

**केज । प्रतिनिधी**

केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या कार्यकुशलतेला पुन्हा एकदा मोठे यश मिळाले आहे. आ. मुंदडा यांनी केलेल्या अविरत पाठपुराव्यामुळे केज शहरासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रस्ते विकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रस्तावित कामांसाठी ३५ कोटी २९ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यानिमित्ताने पहिल्या टप्प्यातील कामांच्या शुभारंभ प्रसंगी आ. मुंदडा यांनी केज शहरासाठी आणखी भरघोस निधी आणण्याचा



दिलेला शब्द पूर्ण केला आहे. वेगाने वाढणाऱ्या केज शहरात दर्जेदार रस्ते असावेत याकडे आ. नमिता मुंदडा यांनी विशेष लक्ष दिले आहे. रस्त्यांची वारंवार होणारी दुरावस्था लक्षात घेऊन शहरात सिमेंट कॉंक्रीटचे पक्के रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी शासनाकडे पाठपुरावा सुरु केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन केज शहरात पहिल्या टप्प्यात सिमेंट कॉंक्रीटचे पाच रस्ते तयार करण्यासाठी नगरोत्थान योजनेतून तब्बल ७५ कोटी ८५ लाखांचा निधी मंजूर झाला होता. हि कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. त्यानंतरही आ. मुंदडा यांनी उर्वरित रस्त्यांसाठी शासन पातळीवर पाठपुरावा सुरूच ठेवला होता. त्यालाही यश आले असून केज शहरासाठी दुसऱ्या टप्प्यात सिमेंट कॉंक्रीटचे बारा रस्ते तयार करण्यासाठी नगरोत्थान योजनेतून ३५ कोटी २९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हे रस्ते देखील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार असून लवकरच या कामाच्या निविदा निघणार आहेत. त्यामुळे केज शहरातील बहुतांशी प्रमुख रस्ते आता खड्डेमुक्त होणार असून नागरिकांना सिमेंट कॉंक्रीटचे मजबूत रस्ते मिळणार आहेत. केजच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी विशेष आभार मानले आहेत. स्व. विमलताई मुंदडा यांच्या विकासाभिमुख भूमिकेचे अनुकरण करत मतदारसंघाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मी प्रयत्नशील आहे. केज शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी प्रयत्नशील असून इतर अत्यावश्यक विविध विकासकामांसाठी देखील सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

## संपादकीय

# विज्ञान

२८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन. १९२८ साली याच दिवशी डॉ. सी. व्ही. रामन यांनी त्यांचा 'रामन इफेक्ट' हा शोध सादर केला होता. विज्ञान दिनाचे औचित्य साधून प्रत्येकाने वैज्ञानकि दृष्टिकोन बाळगायला हवा. भारतातील विद्वानांनी प्राचीन संस्कृतीत वैज्ञानिक तत्त्वे समाविष्ट करून जीवन जगण्याच्या कलेचा आरंभ केला होता. आपल्या दैनंदिन व्यवहारात, जीवनशैलीत, चालीरीती, परंपरांमध्ये सूक्ष्म विज्ञान दडलेले असून सध्याच्या युगातील नवनवीन शोधही याच दुव्याला पुढे नेत आहेत. आपले जीवन सोपे आणि सोयीस्कर बनवण्यात विज्ञानाचे मोठे योगदान आहे. सौरऊर्जा, वैद्यक, शस्त्रास्त्र निर्मिती, कृषी आणि शिक्षण या क्षेत्रांत होत असलेल्या अद्ययावत संशोधन, शोध आणि प्रयोगांचा आपल्याला येत्या काळात अधिक लाभ मिळेल. तथापि, यासाठी नव्या पिढीची विज्ञानाविषयी आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. विज्ञान दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगूया आणि समाजामध्येही विज्ञान वृत्ती भिनवूया. आज एकविसाव्या शतकातील दोन दशके संपली असताना जगातल्या विकसित देशांबरोबरीनेच भारतातही सर्व आधुनिक गोष्टी वापरात आल्या असल्या तरी पुढारलेल्या देशांपेक्षा आपल्या देशांत अंधश्रद्धांचे प्रमाण जास्त असल्याने देशभर विज्ञानाचे वातावरण निर्माण करून, लोकांना विज्ञानाचे महत्त्व पटवून देण्याचा एक प्रयत्न म्हणजे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. भारतातील विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार विजेते डॉ. सी. व्ही. रामन यांनी ज्या दिवशी त्यांचा सुप्रसिद्ध शोध निबंध जगप्रसिद्ध 'नेचर' या विज्ञान नियतकालिकाला पाठवला आणि ज्याला पुढे १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख २८ फेब्रुवारी. तोच राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून आता साजरा करण्यात येतो. विज्ञान दिनाच्या निमित्ताने देशभर विज्ञानाचे वातावरण निर्माण करून लोकांना विज्ञानाचे महत्त्व आणि फायदे समजावणे, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे, याविषयी जागृती करणे, तरुण, विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित व प्रेरित करणे याविषयी विविध उपक्रम राबवले जातात. भारत हा योग व अध्यात्माचा देश आहे, असा समज परदेशातच नव्हे तर आपल्या देशातही पसरलेला आढळतो. तथापि, हजारो वर्षांची विज्ञान आणि तंत्रज्ञानाची परंपरा लाभलेल्या आपल्या देशाने गणितशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र आदी क्षेत्रात तेजस्वी कामगिरी केलेली आहे. अणुऊर्जा कार्यक्रम, अवकाश संशोधन, कृषिविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, संरक्षण, औद्योगिक उत्पादन अशा अनेक क्षेत्रांत गेल्या काही दशकांमध्ये भारतीयांनी लक्षणीय कामगिरी करीत मुसंडी मारली आहे. तीन वर्षांपूर्वी महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाइन यांनी शतकभरापूर्वी केलेले 'गुरुत्व लहरीं'चे भाकित सिद्ध करण्याची अवघड कामगिरी पार पाडणार्या शास्त्रज्ञांमध्ये पुण्याच्या 'आयुका' या आंतर विद्यापीठीय खगोल भौतिकी केंद्रातील खगोल संशोधकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण होते, हे स्पष्ट झाले आहे. तरीही आपण अजून विकसित राष्ट्रांच्या तुलनेत थोडे मागे आहोत. सध्याचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे असून भारतानेही तंत्रज्ञानात मोठी क्रांती केली असून आज देशात सर्वांच्या हातात स्मार्टफोन आला आहे, तर इंटरनेटचा वापर करणार्या भारतीयांची संख्या पन्नास कोटींच्या वर पोहोचली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन सुखी झाले असले, तरी अजूनही समाजामध्ये अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि भानामती यांचे प्रमाण म्हणावे तसे कमी झालेले दिसत नाही. उलट अंधश्रद्धा आणि बुवाबाजी वाढतच असून विज्ञानाची आणि पुराणातील कथित चमत्कारांची सांगड घालण्याचेही प्रकार घडू लागले आहेत. विज्ञान दिनाच्या निमित्ताने लोकांमध्ये जागृती निर्माण करता येईल. आजही समाजात विज्ञान आणि वैज्ञानिकांविषयी अनेक गैरसमज आहेत. विज्ञान म्हणजे काहीतरी अगम्य, गूढ प्रकार असून शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत काहीतरी अनाकलनीय, सर्वसामान्यांना न समजणारे काहीतरी करीत असतात, अशी बर्याच लोकांची धारणा असते. तथापि, विज्ञानामुळेच जीवन सुखकर होत असल्याचे रोजच्या घडामोडीतून आपल्याला पहावयास मिळते. दैनंदिन जीवनामध्ये आपण वापरत असलेल्या कितीतरी वस्तू विज्ञानातील सिद्धांत, तत्त्वे आणि नियमांवर आधारित असल्याचे दिसून येते. विज्ञान कार्यकारण भाव मानते. विज्ञानात चमत्कारांना स्थान नसते. वैज्ञानिक सत्य हे सार्वजनिक, वस्तुनिष्ठ असते आणि त्याचा इंद्रियास अनुभव येऊ शकतो. शास्त्रीय विचार पद्धतीतील या मूलभूत संकल्पना समजून न घेतल्यामुळे विज्ञान इतके परिचित असूनही ते अनाकलनीय आणि अगम्य वाटते. वैज्ञानिक अभ्यास पद्धतीमध्ये समस्यासूत्रण, निरीक्षण, प्रयोग आणि परिणामांचे विश्लेषण आणि सिद्धांत हे प्रमुख टप्पे असतात. तथापि, शाळेमध्ये विज्ञान चार भिंतीच्या आत पुस्तकांच्या आधारे शिकविले जाते. निरीक्षण आणि प्रयोग यातून विज्ञानाची गोडी लावण्याचे काम शाळांतून व्हायला हवे, असे वाटते. ज्या 'रामन परिणामा'च्या निमित्ताने विज्ञान दिन साजरा केला जातो, तो परिणाम रामन यांना सन १९२४ च्या कॅनडामधील जागतिक परिषदेस जाताना बोटीच्या प्रवासात समुद्राचे आणि आकाशाचे निरीक्षण करूनच सुचला. भारत हा तरुण लोकसंख्येचा देश असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोन तरुण पिढींमध्ये रुजविण्याची, त्यांच्या कुतूहल बुद्धीला प्रोत्साहन देण्याची आज आवश्यकता आहे. या वर्षाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भारतात वैज्ञानिक क्रांती करण्याचे आपण ठरवूया.


# ठाकरेंचेच परभणी लोकसभा मतदार संघावर वर्चस्व



**परभणी । वृत्तसेवा**

'जगात जर्मनी आणि भारतात परभणी' पासून ते 'बनी तो बनी नही तो परभणी' सारख्या म्हणींसाठी या जिल्ह्याचा गवगवा आहे. पण याचा अर्थ काय आणि त्यामुळे लोकांच्या जीवनात काय बदल घडला आहे असे प्रश्न इथे गैरलागू आहेत. परभणी लोकसभा मतदारसंघात केवळ परभणी जिल्हाच येत नाही तर जालना जिल्ह्यातील घनसावंगी आणि परतूर हे विधानसभा मतदारसंघ येतात. त्यामुळे परभणी आणि जालना दोन्ही जिल्ह्यांचा हा मतदारसंघ आहे. परभणी मतदारसंघ हा शिवसेनाचा बालेकिल्ला म्हटला जातो. शिवसेनेच्या तिकिटावरुन अशोक देशमुख हे लोकसभेत पोहचले तेव्हापासून ते आतापर्यंत केवळ एक अपवाद वगळता नेहमीच शिवसेनेचा खासदार परभणीतून लोकसभेत गेला आहे. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर परभणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि लोकसभा मतदारसंघाचे खासदार दोघेही उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहिले आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदेंच्या बंडाचा या लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघावर परिणाम झाला नाही. शिवसेनेची निवडणूक म्हटलं की 'खान की बाण' हा प्रचार व्हायचाच. लोकसभेच्या निवडणुकीसाठी आतापर्यंत काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसने एकदाही मुस्लीम उमेदवार उभा केलेला नाही तरीदेखील प्रचाराच्या वेळी मात्र तसंच म्हटलं जातं हे विशेष आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणवला जाणारा हा मतदारसंघ एकेकाळी कम्युनिस्ट आणि काँग्रेस या पक्षांकडे होता यावर आजच्या पिढीतील तरुणांचा विश्वास बसणार नाही. शेतकरी कामगार पक्षाचे दोन खासदार नारायणराव वाघमारे आणि शेषराव देशमुख हे याच मतदारसंघातून लोकसभेवर गेले होते. काँग्रेसचे नागोराव पांगरकर, शिवाजीराव देशमुख, रामराव यादव लोणीकर हे नेते लोकसभेवर निवडून गेले होते. परभणी जिल्ह्यात सहकार क्षेत्राचं काम काँग्रेस नेत्यांच्या पुढाकारातूनच सुरू झालं होतं. त्याच सहकार चळवळीतील शिवाजीराव देशमुख एक नेते होते.

# शासनाच्या नवीन वाळू धोरणात डेपो व्यवस्थापनाचा खर्च ग्राहकांच्या माथी



**नगर । वृत्तसेवा**

नवीन वाळू धोरणात सहाशे रुपये ब्रासने वळू मिळत असली तरी त्यात डेपो व्यवस्थापनाचा भार ग्राहकांच्या माथी टाकण्यात आली आहे. याशिवाय इतर दर पाहता एक ब्रास वाळुला हजारावर पैसे मोजावे लागत असल्याचे वस्ताव 'पुढारी'च्या हाती लागले. महसूल विभागातील क्लास वन अधिकार्यास अडीच ब्रास वाळुसाठी ५ हजार ४२१ रुपये मोजावे लागल्याचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात आता शासकीय दरातील वाढ पाहता वाळू घ्यावी की नाही, असा प्रश्न अनेकांसमोर पडला आहे. वाळूपेक्षा क्रश सॅण्डकडे ग्राहकांचा कल वाढत असल्याचे दिसून येते. सहाशे रुपये ब्रास दराने सर्वसामान्यांना वाळू विक्रीचा निर्णय शासनाने घेतला होता. नगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी शासकीय वाळू डेपो सुरू झाले. दरम्यान, ६०० रुपये ब्रास शासकीय दरात खरेदी केलेल्या वाळू वाहतुकीवरून वाद सुरू झाले. त्यातच शासनाचे सुधारीत वाळू धोरणाचा अध्यादेश समोर आला. नवीन अध्यादेशात डेपो व्यवस्थापनाचा दर ग्राहकांच्या माथी मारला आहे. परिणामी प्रति ब्रास वाळूसाठी ग्राहकांना सुमारे दोन हजार रुपये मोजावे लागत असल्याचे वास्तव समोर आले. शासनाची स्वस्तात वाळू धोरणापेक्षा ती न वापरलेलीच बरी, त्यापेक्षा क्रश सॅण्ड बरा, असे म्हणण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. नगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी शासकीय वाळू विक्री डेपो सुरू झाले. राहुरी तालुक्यात बारागाव नांदूर-डिग्रस गावालगत मुळा नदी पात्रामध्ये शासकीय वाळू डेपो सुरू झाला. शासनाकडे वाळू नोंदणी व बुकींग करण्यासाठी गर्दी वाढली. वाळू दर व त्यावरील करासह ग्राहकांना ६३३ रुपये प्रति ब्रास पावती दिली जात होती. मात्र डेपोचालक स्वतंत्रपणे वाळू वाहतूक दर आकारणी करत होते. शासकीय वाळू दरापेक्षा वाहतूक खर्च अधिक होत असल्याने वाहतूक दराबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आ. प्राजक्त तनपुरे यांनी महसूल प्रशासनाची बैठक घेतली. त्यावेळी शासन नियुक्त 'शौर्य कंपनी' सॉफ्टवेअरमध्ये नगर जिल्ह्यातील वाळू साठ्याला होल्ड लावण्यात आल्याचे समोर आले. शासन आदेशानुसार नगर जिल्ह्यातील वाळू डेपोला होल्ड लावण्यात आल्याचे 'शौर्य' कंपनीकडून सांगण्यात आले. पूर्वी डेपो व्यवस्थापन/लिलाव खर्च शासन करत होते, आता तो खर्चही ग्राहकांच्या माथी मारल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे केवळ नगर जिल्हाच नव्हे तर राज्यभरातील शासकीय वाळू महागली आहे. कागदोपत्री सहाशे रुपये ब्रास वाळू मिळत असली तरी वाहतूक खर्च, इतर कर व डेपो व्यवस्थापन हे छुपे खर्च पाहता शासकीय वाळू प्रति ब्राससाठी दोन हजार रुपये मोजावे लागत असल्याचे वास्तव 'पुढारी'च्या पाहणीत समोर आले. शौर्य कंपनीच्या वेबपोर्टल नुसार शासनाने राज्यात ५४४ ठिकाणी शासकीय वाळू डेपोचे प्रयोजन केले आहे. त्यातील १५९ ठिकाणी वाळू साठे उपलब्ध आहेत. जुन्या बुकिंगनुसार राज्यात ४ लाख ४९ हजार ३१९ ब्रास वाळूचा शासनाने ग्राहकांना पुरवठा केला. त्यानंतरही आता १ लाख ३४ हजार ०६९ ब्रास वाळू शासनाकडे विक्रीसाठी उपलब्ध आहे. मात्र राज्यातील ७५ हजार १२१ ब्रास वाळू बुकींग ग्राहकांनी केलेली आहे. राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर शासकीय वाळू डेपोतून १ हजार ९३ ग्राहकांनी वाळू खरेदी करताना शासन तिजोरीत ३६ लाख रुपये भरले. जुन्या बुकींगनुसार अद्यापही ६ हजार ब्रास वाळुचा पुरवठा झालेला नाही. १९ मार्च पर्यंत जुनी बुकींगची वाळू ग्राहकांना पोहोच होणार आहे.त्यामुळे ते नशीबवान म्हणावे लागेल. कारण नव्या अद्यादेशात वाळूचे भाव वाढले आहेत.

# राज्यातील भूप्रणाम केंद्राची १ एप्रिलपासून सुरुवात

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

भूमीअभिलेख विभागाच्या वतीने पिंपरी-चिंचवडच्या धर्तीवर राज्यातील दुसरे भूप्रणाम केंद्र छत्रपती संभाजीनगरात सुरु केले जाणार आहे. एकाच छताखाली भूमीअभिलेख विभागाशी संबंधीत सर्व कागदपत्रे या केंद्रातून दिली जाणार असल्यामुळे दलालांचा अटकाव घातला जाणार आहे. १ एप्रिलपासून या केंद्राची सुरुवात करण्यात येईल अशी माहिती भूमी अभिलेख विभागाचे अधीक्षक विजय वीर यांनी मंगळवारी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील भूमी अभिलेख कार्यालयात दलालांचा सुळसुळाट वाढला आहे. पीआर कार्डच्या नकला, सातबारा, फेरफारच्या नोंदीसाठी दलालांकडून पैसे उकळले जातात. पिंपरी-चिंचवडमध्ये अशाच प्रकारे नागरिकांकडून पैसे उकळले जात होते. त्यामुळे आयुक्त सुधांशू यांनी दलालांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी सर्व कागदपत्रे एकाच छताखाली मिळावी म्हणून भूप्रणाम केंद्राची स्थापना केली आहे. मोजणी अर्ज, वारस अर्ज, फेरफार, पीआर कार्ड, सातबारा नक्कल अशी कागदपत्रे एकाच छताखाली जागेवरच दिली जाणार आहेत. भूमी अभिलेख प्रबोधिनीमध्ये केंद्र स्थापन केले जाणार आहे. हे केंद्र वातानुकुलीत असणार आहे. महाभुमी पोर्टलवरुन घर बसल्या अर्ज करता येतो. नागरिकांनी या पोर्टलचा वापर करावा. मराठवाड्यात भूप्रणाम हे पहिलेच केंद्र उभारले जात आहे. त्यासाठी दहा लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय नुकत्याच १६० वारसांचे अर्ज घेत फायली निकाली काढण्यात आल्या आहेत.

# गुप्तधनाच्या लालसेने घरातच खोदला खड्डा

हिंगोली - गुप्तधन काढण्याच्या उद्देशाने स्वत:च्या घरात जादूटोणाच्या वापर करीत १० ते १२ फूट खोल खड्डा खोदल्याचा प्रकार कळमनुरी तालुक्यातील तुप्पा येथे उघडकीस आला. याप्रकरणी सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ फेब्रुवारी रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास कळमनुरी तालुक्यातील तुप्पा येथे शिवप्रसाद आत्माराम सूर्यवंशी यांच्या घरात खड्डा खोदून गुप्तधन काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे पोलिसांच्या तपासणीत आढळले. आदल्या दिवशी रात्रीपासूनच या घरात संशयास्पद हालचाली सुरू होत्या. भानामती, कारणी या नावाने अनिष्ठ व अघोरी कृत्य किंवा जादूटोणा यासारखा प्रकार सुरू असल्याचे गावातील काही लोकांना कळाले. यावरून त्यांनी पोलिसांना कळविले होते. त्यानंतर पोलिसांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता जादूटोण्याचा वापर करीत घरात गुप्तधन शोधताना आढळले.

# अंतरिम अर्थसंकल्पात केवळ आश्वासनच -माजी मंत्री देशमुख



**नागपूर । वृत्तसेवा**

अंतरिम अर्थसंकल्प हा केवळ आश्वासनच असल्याचा आरोप माजी गृहमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते देशमुख यांनी केला आहे. वन्य प्राण्यापासून शेतीचे नुकसान होऊ नये म्हणून डॉ. मुखर्जी योजनेमध्ये निधी देण्याची घोषणा करण्यात आली. परंतु याचा लाभ हा केवळ बफर झोन एरियातच होणार आहे. इतर जंगलाच्या भोवती वन्य प्राण्यांमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असताना त्याच्यासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. शेतकरी आज अडचणीत आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. अवकाळी पावसाने नुकसान होऊन देखील मदत मिळत नाही. एक रुपया पिक विम्याचा लाभ शेतकऱ्यांना झाल्याचे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना पिक विम्याची कोणतीही मदत मिळाली नाही. एकूणच या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांच्या तसेच उद्योजक, व्यापारी, सर्वसामान्य नागरिकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम झाल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

# विज्ञानातून नाविन्य आणि सर्वसमावेशक विकासाची वाटचाल

**मुंबई । वृत्तसेवा**

दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. प्रख्यात भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. रामण यांच्या 'रामण प्रभावा'च्या शोधाला त्यातून आदरांजलीच वाहिली जाते. हा दिन साजरा करण्याच्या स्वरूपाची संकल्पना दरवर्षी बदलते. यावर्षी 'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' ही संकल्पना निश्चित केली आहे. यामधून देशाच्या आत्मनिर्भर आणि शाश्वत विकासाचे प्रतिबिंब दिसते. स्वदेशी तंत्रज्ञान स्वीकारणे ही केवळ परंपरेला मान्यता नसून, लवचीक, सुदृढ, समृद्ध आणि प्रगत भारत घडवण्याच्या दिशेने एक धोरणात्मक पाऊल आहे. आधुनिक नवकल्पनांसह विणलेल्या पारंपारिक ज्ञानाची एका अर्थी पुनर्मांडणी आहे. स्थानिक ज्ञान प्रणालींमध्ये खोलवर रुजलेली तंत्रज्ञाने देशभरातील विविध समुदायांसमोरील आव्हानांचा सामना करतील. पाणी आणि मातीचे संरक्षण करणार्या प्राचीन कृषी पद्धतींपासून ते अक्षय्य ऊर्जा आणि आरोग्य सेवेमध्ये समकालीन रूपांतरापर्यंत स्वदेशी तंत्रज्ञान भारताच्या सांस्कृतिक जडणघडणीत अंतर्भूत असलेल्या नावीन्यपूर्णतेच्या भावनेला मूर्त रूप देईल, असा विश्वास वाटतो. स्वदेशी तंत्रज्ञानाला चालना देणे म्हणजे आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नपूर्तीकडे अखंडपणे वाटचाल करणे आहे. आत्मनिर्भरतेवर भर देणे आणि बाह्य स्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे, तसेच स्थानिक संसाधने आणि कौशल्याचा उपयोग करून, भारतीय समुदाय विकासासाठी त्यांचे स्वतःचे मार्ग तयार करणे यांचा त्यात विचार होऊ शकतो. या प्रक्रियेत सर्वसमावेशकता आणि राष्ट्रीयत्वाची भावना निश्चित होण्यास मदत होईल. हा दृष्टिकोन केवळ आर्थिक विकासाला चालना देणार नाही, तर तळागाळातील नवोदित घटकांना आणि उद्योजकांना सशक्त करून सामाजिक बांधणी मजबूत करेल. देशी तंत्रज्ञानाचा प्रचार, सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि पर्यावरणीय कारभाराला चालना देण्यासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल. जुन्या पद्धती आणि स्वदेशी ज्ञान प्रणालींचा वापर करून, आपण आपल्या पूर्वजांच्या शहाणपणाचा केवळ आदरच करणार नाही, तर निसर्गाशी अधिक सुसंवादी नातेसंबंधाचा मार्गही मोकळा होईल. पर्यावरणपूरक बांधकाम तंत्रांपासून ते हर्बल औषधी आणि पारंपारिक हस्तकलेपर्यंत ही तंत्रज्ञाने विकासासाठी एक समग्र दृष्टिकोन देतील, यादृष्टीने भारत सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. 'मेक इन इंडिया' मोहिमेसारखे उपक्रम आणि 'स्टार्टअप इंडिया'सारख्या योजनांचा उद्देश नावीन्य आणि उद्योजकता वाढवणे, स्वदेशी तंत्रज्ञान विकासासाठी व्यासपीठ आणि प्रोत्साहन प्रदान करणे असा आहे. याशिवाय शाश्वत शेतीवरील राष्ट्रीय मिशन आणि अटल इनोव्हेशन मिशन यांसारख्या योजना, शाश्वत पद्धतींना चालना देण्यावर भर देतात. हे समग्र प्रयत्न सर्वसमावेशक वाढ आणि शाश्वत विकासाचे चालक म्हणून स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला अधोरेखित करताना दिसतात. आपण राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करत असताना, नावीन्य आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्याच्या आपल्यादेखील वचनबद्धतेची पुष्टी करूया. स्वदेशी ज्ञानाचे आमचे समृद्ध पटल स्वीकारून आणि समकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी त्याचा उपयोग करून, आपण असे भविष्य घडवूया, जिथे भारत शाश्वतपणे भरभराटीला येईल. आजही आपल्या देशात विज्ञान अभ्यासाकडे विद्यार्थ्यांना म्हणावा तसा कल नाही. यासाठी प्राथमिक स्तरापासून विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लावण्याची शिक्षकांसह पालकांची जबाबदारी आहे. त्यासाठी गाव पातळीसह जिल्हा पातळीवर सातत्याने विज्ञान प्रदर्शने भरवावी लागतील. बहुतांश शाळांत विज्ञान प्रदर्शने भरवली जातात; पण त्याचे प्रमाण म्हणावे तितके नाही. त्यासाठी सर्वच पातळ्यांवर प्रयत्नांची गरज अधोरेखित होते. देशाची वाटचाल आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने सुरू आहे. त्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मोठा वाटा असणार आहे.

# पिकांमध्ये गांजाची लागवड

**नाशिक । वृत्तसेवा**

शिरपूर पोलीस दलाने अंमली पदार्थच्या विरोधात मोठी कारवाई केली आहे. शिरपूर तालुक्यातील लाकड्या हनुमान गावाच्या परिसरात तब्बल ३ एकर क्षेत्रावर गांजाची शेती उखडून फेकण्यात धुळे एलसीबी आणि सांगवी पोलिसांना यश आले आहे. प्राथमिक माहिती नुसार पकडलेल्या ओल्या आणि सुक्या गांजाची किंमत कोट्यवधींच्या घरात आहे. अलीकडे जिल्ह्यात होणाऱ्या अंमली पदार्थच्या विरोधातील मोठ्या कारवाईचे प्रमाण लक्षात घेता धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे हे देखील या कारवाईस्थळी पोहोचले होते. शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या रेकलीयापाणी धरणाच्या वाहत्या पाण्यालगत आणि अन्य तीन ठिकाणी गांजाची शेती होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार धुळे स्थानिक गुन्हे शाखा आणि सांगवी पोलिसांनी संयुक्तरित्या छापा टाकला. यावेळी बाजरी, ज्वारी पिकाच्याआड गांजाची लागवड आढळून आली. सुमारे २ ते ३



एकर क्षेत्रात ५ ते ७ फुट उंचीचे गांजाची झाडे आढळलीत. शिवाय, एका झोपडीतूनही सुकवलेला १०० ते १२० किलो वजनाचा कोरडा गांजा देखील यावेळी मिळून आला. काही महिन्यांपूर्वी याच परिसरात आंतरपीक म्हणून गांजाची शेतीवर स्थानिक गुन्हा अन्वेषन शाखा आणि शिरपूर तालुका पोलीस पथकाने छापा टाकून तब्बल ७२१ किलो ४०० ग्रॅम वजनाचा तीन कोटी दहा हजार रूपये किंमतीचा ओला गांजा जप्त केला होता. त्यावेळी ही कारवाई आजपर्यंतची जिल्ह्यातील सर्वात मोठी कारवाई असल्याचे दिसून आले होते. मात्र, आता याच परिसरात केलेल्या या कारवाईमुळे शेतात गांजा पिकवण्याचे शेतकऱ्यांचे पुन्हा धाडस झाल्याचे दिसून आले आहे. घटनास्थळी दोन तीन एकरावर उघडपणे गांजाची शेती केली जाते. विशेष म्हणजे वनविभागाच्या जमिनीवरच ही शेती फुलवली जात आहे. आपल्या हद्दीत, आपल्याच जमिनीवर मोठ्या प्रमाणात कोट्यावधींच्या गांजाची शेती होत असताना, वनविभाग नेमके काय करत होते? असा प्रश्न पोलिसांच्या कारवाईच्या निमित्ताने उपस्थित होत आहे. वनविभागाने वेळोवेळी गस्त घालुन आपल्या भागात अवैध काही होत असेल तर ते रोखण्याची आणि त्याची माहिती पोलीस यंत्रणेला देणे वनविभागाला बंधनकारक आहे. मात्र वनविभागाने तसे काही केले नाही. त्यामुळे पोलीस विभागातर्फे सर्व संबंधित वन विभागाचे अधिकारी कर्मचारी यांचा गंभीर कसुरी अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षकांनी दिली आहे. पोलिसांनी टाकलेल्या या छाप्यानंतर मुद्देमालाची मोजणी युद्ध पातळीवर सुरू झाली असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया ही सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, डीवायएसपी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पीआय दत्तात्रय शिंदे, पीआय श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असल्याची माहिती देखील पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

## पुणे ते नागपूर प्रवास फक्त ४ तासात

पुणे – गेल्या काही वर्षांमध्ये देशाच्या पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर शासनाने अधिक लक्ष केंद्रित केले आहे. प्रामुख्याने दळणवळण व्यवस्था सुधारण्यावर शासनाने अधिक भर दिला असून यामुळे आता महाराष्ट्रासहित संपूर्ण देशाची दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून देशभरात भारतमाला परियोजना अंतर्गत महामार्गाचे जाळे विणले जात आहे. या परियोजनेच्या पहिल्या टप्प्या अंतर्गत जवळपास तीन हजार किलोमीटर लांबीच्या महामार्गांची कामे सुरू आहेत. यातील काही कामे पूर्ण झाली आहेत तर काही कामे अजूनही सुरू आहेत. विशेष म्हणजे ही सर्व महामार्ग ग्रीनफिल्ड कॉरिडोर आहेत. दरम्यान भारतमाला परियोजनेचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर आता सरकारने या योजनेचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. या अंतर्गत राज्यासहित संपूर्ण देशभरात हजारो किलोमीटरचे महामार्ग तयार होणार आहेत. या अंतर्गत छत्रपती संभाजी नगर ते पुणे असा हरीत महामार्ग तयार करण्याची घोषणा करण्यात आली होती. जवळपास दोन वर्षांपूर्वी ही घोषणा झाली. दरम्यान याच प्रस्तावित महामार्ग संदर्भात नुकतीच एक अतिशय महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. या महामार्गाला आता मंजुरी मिळाली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत मोठी माहिती दिली आहे. मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे, या महामार्गाला आता मंजुरी मिळाली असून हा मार्ग बीओटीवर बांधला जाईल असे निश्चित करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती देताना गडकरी यांनी सांगितले की, हा रस्ता महाराष्ट्र पायाभूत सुविधा महामंडळाकडे हस्तांतरित केला जाईल. यासाठी हुडको कडून तीन हजार कोटींचे कर्ज उपलब्ध होईल. येत्या दोन दिवसात याबाबतच्या निर्णयाची प्रत मुंबई व क्षत्रिय कार्यालयाकडे सोपवली जाणार अशी महत्त्वाची माहिती मंत्री महोदय यांनी यावेळी दिली आहे.

## दिव्यांग विशेष शिक्षकांना वाहतूक भत्ता लागू

मुंबई – अपंग समावेशित शिक्षण योजना (प्राथमिक स्तर) अंतर्गत करार पद्धतीने कार्यरत दिव्यांग विशेष शिक्षकांना वाहतूक भत्ता लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असून शिक्षकांच्या मागणीच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयाला मंजुरी घेण्यात आली. दिव्यांग शिक्षकांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन वाहतूक भत्ता वाढविण्याचा आणि २० फेब्रुवारी २०२२ च्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात यावा अशी मागणी केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत आणण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर राज्यातील ६ जिल्हा समन्वयक, ५२ विशेष तज्ज्ञ/ समावेशित शिक्षक व १५८ विशेष शिक्षक अशा २१६ कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## खाजगी शाळेतून देगलूर तालुका स्तरावर प्रथम क्रमांक

देगलूर – मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वकांक्षी उपक्रमात खाजगी शाळेतून देगलूर तालुका स्तरावर प्रथम क्रमांक ग्रामीण भागातील जागृती विद्यालय होट्टल या शाळेने पटकावले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षीच्या उपक्रमात शंभर गुणाची विविध घटकावर तपासणी करण्यात आली. यात केंद्रस्तर पथक ,तालुकास्तरीय पथक व जिल्हा पथक या स्तरावर शाळेची तपासणी केली गेली. अनुक्रमे ग्रामीण भागातून तालुकास्तरावरील सर्वश्रेष्ठ गुणांकन प्राप्त करून या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. या शाळेची स्थापना........ ला झाली असून या विद्यालयाने अनेक डॉक्टर, इंजिनियर, नेते, व्यापारी, शिक्षक, पत्रकार आदी घडवली आहेत. अगदी पूर्वीपासूनच ही यशाची परंपरा जिल्ह्यात आणि ग्रामीण स्तरावर कायम राखली आहे, ही शैक्षणिक संस्था नावाजलेली असून ही यशाची परंपरा आजतागायत चालू असून वक्तृत्व, क्रीडा, स्काऊट गाईड, विज्ञान प्रदर्शन, निबंध लेखन आदी स्पर्धेमध्ये सुद्धा तालुका, जिल्हा, राज्य स्तरापर्यंत बाजी मारली आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात देखील या शाळेने सीबीएससी तसेच इंग्रजी माध्यम शाळा यांच्या तुलनेत ग्रामीण भागातील मराठी माध्यमाची शाळा म्हणून अस्मिता जागी ठेवली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण सभापती अँड रामराव नाईक यांनी मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षकोत्तर यांचं अभिनंदन केले. ग्रामीण भागातील प्रतिष्ठीत नागरिकांनी जागृती विद्यालय होट्टल च्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी यांनी अतिशय मेहनत घेऊन आपली यशाची परंपरा कायम ठेऊन आपल्या विद्यालयाच नाव लौकिक केले असून त्याच्या पाठीवर कौतुक थाप देत त्यांना भावी शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आता पाच नाहीतर सहा वर्षे पूर्ण झाल्यावर पहिलीत प्रवेश

**मुंबई । वृत्तसेवा**

पुढील शैक्षणिक वयाची ६ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यालाच प्रवेश मिळणार आहे. इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थाचे वय निश्चित करण्यात आले असून आदेश जारी करण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक सत्र २०२४-२५ साठी प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे. त्या अनुषंगाने इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेण्यासाठी मुलाचे वय किमान ६ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे, असे केंद्राने राज्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. एनईपी २०२० अंतर्गत ही वयोमर्यादा प्रस्तावित आहे, यावर गेल्या वर्षी देखील चर्चा झाली होती. गेल्यावर्षीही असेच पत्र पाठवण्यात आले होते. आता सरकारने पुन्हा एकदा शाळांना आठवण करुन दिली आहे. या निर्णयामुळे आता सहा वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश मिळणार नाही. याआधी खाजगी शाळांमध्ये कमी वयाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जायचा. यामुळे विद्यार्थ्यांवर कमी वयात अभ्यासाचा भार पडायचा. परिणामी, अनेकांना बालपण अनुभवायला मिळत नव्हते. तसेच विद्यार्थ्यांच्या मेंदूच्या विकासावरही परिणाम व्हायचा. काही राज्यांमध्ये पाच वर्षांच्या मुलाला पहिलीत प्रवेश दिला जायचा. त्यामुळे या मुलांची पदवी इतर राज्यातील मुलांच्या तुलनेत एक वर्ष आधी पूर्ण व्हायची. त्यामुळे असे विद्यार्थी सरकारी नोकर भरतीसाठी इतरांच्या तुलनेत एक वर्ष आधी पात्र ठरायचे.

## दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची फीस माफ होणार

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आज तिसऱ्या दिवशी दृष्काळसदृष्य भागातील विद्यापीठांमध्ये फी माफीचा मुद्दा उपस्थित केला. विद्यापीठांकडून फी माफीची अंमलबजावणी होताना दिसत नाही. जुनमध्ये कोणाचीही १ रुपया फी घेता कामा नये, असे आदेश देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांच्या फी माफीच मुद्दा उपस्थित करताना म्हटले की, खासगी विद्यापीठ स्थापनेच्या बाबतीतलं २०२४ चं विधेयक आहे. आपल्या राज्यात नवीन खासगी विद्यापीठ येत आहेत, याबद्दल आम्ही स्वागत करतो. परंतु जी काही नियमावली घालून दिली गेली आहे, त्या नियमावलीचं पालन होतं की नाही आणि विद्यार्थ्यांना त्याठिकाणी ठरवून दिलेली फी असतानाही भरमसाठ फी घेतली जाते. या बाबतीत राज्य सराकारचं नियंत्रण असलं पाहिजे.



विद्यापीठाची परवानगी घेत असताना हे सर्व नियम पाळून त्याठिकाणी करार होतो, शपथपत्र होतं, त्याठिकाणी ते दिलं जातं. परंतु ग्रामीण भागातील विद्यापीठ फी माफीची अंमलबजावणी करताना दिसत नाही. कोपर गावसारख्या ग्रामीण भागात विद्यापीठ होत आहे, याचा आम्हाला आनंद आहे. पण या विद्यापीठांमध्ये गोर-गरीब शेतकरी, शेतमजुरांची लेकरं यामध्ये शिक्षण घेतात, तेव्हा नियमाप्रमाणे जी काही फी नियमण शुल्क ठरवून दिले आहे, ती त्यांनी घेतली पाहिजे. याविषयी कडक कायदा राज्य सरकारने करून त्यांच्यावर बंधन घालावं अशी सूचना मी संबंधित मंत्र्यांना करतो. तसेच इतर विद्यापीठांचं ऑडीट करतो, त्याप्रमाणे स्वायत्त विद्यापीठांचंही फीच्या बाबतीत आणि विद्यार्थ्यांच्या एकूण भौतिक सुविधा बाबतीतला ऑडीट राज्य सरकारने करावं, अशी बंधनसुद्धा असावी, अशी मागणी केली. उपसभापती म्हणाल्या की, मी परवा संभाजीनगरला गेले होते. त्याठिकाणी मला विद्यार्थ्यांनी पत्र दाखवलं की, सर्वांनी फी भरावी. शासनाने जीआर काढला आहे की, दुष्काळी भागामध्ये शाळा आणि कॉलेज यांची फी घेता कामा नये. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, संभाजीनगरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला विचारणा करून योग्य त्या सूचना द्याव्यात आणि दुष्काळसदृष्य परिस्थिती आहे, अशा ठिकाणी फी माफीसंदर्भात जीआरची अंमलबजावणी झाली नाही आहे, त्याठिकाणी अंमलबजावणी होण्यासंदर्भात कडक पाऊल उचलणार का? असा प्रश्न नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केला. मागच्या अधिवेशनात कोविडमध्ये आई किंवा वडील, किंवा दोघेही गेले तर अशा विद्यार्थ्यांची त्या वर्षाची नाही तर पूर्ण शिक्षण होईपर्यंत फी माफीचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र विद्यापीठ अंमलबजावणी करत नव्हते, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी जॉईन बोर्ड ऑफ ईसीजी दर तीन महिन्यांनी कुलगुरुंची परिषद राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली कडक सूचना दिल्या. त्यानंतर प्रत्येक विद्यापीठाने पत्रक काढलं. त्यामुळे आई-वडील नसलेल्लांना पोस्ट गॅज्युएट होईपर्यंत फी घेतली जाणार, याशिवाय दुष्काळसदृष्य परिस्थिती म्हटल्यानंतर त्यात फी सवलतीची सोय असते. त्यामुळे सर्व विद्यापीठांना एक पत्रक काढून जुनमध्ये कोणाचीही १ रुपया फी घेता कामा नये. पहिलं परीक्षा फीचं केल्यानंतर संपूर्ण फी माफीचं करू.

## जालना जिल्ह्याला अवकाळीचा तडाखा

**जालना । वृत्तसेवा**

जालना जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये अवकाळी पाऊस व गारपिटीने तडाखा दिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. जाफराबाद तालुक्यातील अनेक गावांत सायंकाळी मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने ज्वारी, मिरची, शेडनेट भाजीपाल्याचे चांगलेच नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. हवामान खात्याने गारपीट व अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार सोमवारी सायंकाळी पावसाला सुरूवात झाली. काही वेळताच प्रचंड गारपीट झाल्याने जाफराबाद तालुक्यातील अनेक गावांमध्ये धांदल उडाली. यात अकोलादेव, टेंभूर्णी, भारज, काळेगाव, नांदखेडा अनेक गावांना गारपिटीचा तडाखा बसला. काही



गावांमध्ये रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा खंडित होता. कुंभारी येथील पल्लवी विशाल दाभाडे (वय १९) या महिला शेतकऱ्यासह सिपोरा बाजार येथील शिवाजी गणपत कड ( वय ३८) या दोघांचा वीज अंगावर कोसळून मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. गारपीट व पावसामुळे काढणीला आलेल्या ज्वारीचे मोठे नुकसान होण्याचा अंदाज शेतकरी व्यक्त करत आहेत. ज्वारीची कणसे काळे पडून उत्पादनावर परिणाम होणार आहे. शेडनेटचेही अनेक गावांत नुकसान झाल्याने भाजीपाला उत्पादक धास्तावले आहेत. गहू, हरभरा पिकांनाही चांगला फटका बसला आहे. जालना, बदनापूर, भोकरदन, अंबड, घनसावंगी, मंठा, परतूर आदी तालुक्यातील काही गावांमध्ये पाऊस झाला. जाफराबाद तालुक्यातील गारपिटीमुळे आंबा, मोसंबीसह इतर फळबागांना चांगलाच फटका बसला आहे. मोहरलेल्या आंब्याचे नुकसान झाले असुन मोहर गळून पडला आहे. तर मोसंबीला गारांचा फटका बसल्याने मोठ्या प्रमाणात मोसंबीला गळती लागली. जाफराबाद तालुक्यात सोमवारी वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला या पावसामुळे शेतकऱ्यांचे गहू, हरभरा, शाळु, आंबा, मोसंबी फळपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.दरम्यान या गारांचा ढीग साचल्याचे काही व्हिडिओ देखील समोर येत आहे त्यामुळे रब्बी हंगामातील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

## बनावट नोटांची छपाई

**पुणे । वृत्तसेवा**

शहरातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. आयटी डिप्लोमा झालेल्या तरुणांनी गुन्हेगारी सुरु केली. व्यवसायात जम बसला नाही, त्यामुळे त्यांनी बनावट नोटांचा कारखाना सुरु केला. आता पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बनावट नोटा छापणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केलाय. या प्रकरणात सहा जणांना पुणे पोलिसांनी अटक करण्यात आली आहे. ऑफसेट मशीनवर बनावट नोटा छापत होते. ही नोट हुबेहुब त्यांनी तयार केली. एकूण ७० हजार रुपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. पुणे शहरातील सहा तरुणांनी व्यवसाय सुरु केला. त्यामध्ये एक जण आयटीमध्ये डिप्लोमा केलेला युवक आहे. या युवकांनी नवीन प्रिंटिंग प्रेस घेतले. त्यानंतर छापाईचा व्यवसाय सुरू केला. व्यवसायात मंदी आली. त्यांचा व्यवसाय चालू लागला नाही. त्यानंतर चीनमधून ऑनलाइन बनावट नोटा छापण्यासाठी कागद मागवला. त्या कागदावर ५०० रुपयांच्या बनावट नोटा छापण्यास सुरुवात केली. ७० हजारांच्या नोटाही त्यांनी छापल्या. त्या विकत असताना देहूरोड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आणि अवघ्या टोळीचा पर्दाफाश झाला.

# खासदार,आमदारांना सरकारी रुग्णालयातच उपचार सक्ती करा

**नगर । वृत्तसेवा**

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी आमदार, खासदारांसह सरकारी कर्मचारी आणि अधिकार्यांना खासगी व्यवस्थेतून उपचार करण्यासाठी दिली जाणारी रक्कम पूर्णपणे बंद करून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतच उपचार घेणे सक्तीचे करावे, अशी मागणी सिटीझन फोरम संघटनेच्या वतीने लोकायुक्तांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, नगरच्या जिल्हा रुग्णालयाकडेही या अर्जाची दखल घेताना येथील आरोग्य सोयीसुविधा, मनुष्यबळ, औषध पुरवठा याबाबत माहिती संकलित केली जात असल्याचे समजले आहे. नागरिकांना संविधानाने प्राप्त दर्जेदार, गुणवत्तापूर्ण सार्वजनिक आरोग्य व्यवस्था या मुलभूत अधिकाराचे राज्य सरकारकडून होणार्या पायमल्लीविरोधात 'अलर्ट सिटीझन फोरम'च्या वतीने थेट लोकायुक्तांकडे तक्रार करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मृत्युशय्येवर असल्याचे काही ठिकाणी झालेल्या मृत्युच्या तांडवावरून अधोरेखीत झाले आहे. आरोग्य व्यवस्थेची अशीच दयनिय अवस्था ही ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका रुग्णालय, तालुका रुग्णालय ते जिल्हा रुग्णालयांपर्यंत आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत शासन-प्रशासन, लोकप्रतिनिधी, असंवेदनशील सरकार हे उदासिन असल्याचे दिसते. आरोग्य व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी जागतिक बँकेने दिलेल्या मदतीचा, कर्जाचा विनियोग योग्य रितीने न करता त्याला आर्थिक भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचा आरोपही या पत्रात करण्यात आला आहे. त्यामुळे आजही अनेक ठिकाणी पायाभूत सुविधा, मनुष्यबळाचा प्रश्न जाणवत असल्याचे म्हटले आहे. कर्मचार्यांना बायोमेट्रीक हजेरी वेतनाशी जोडावी, जेणेकरून कार्यालयीन वेळेत खासगी क्लिनीक चालविण्याला लगाम बसेल. खरेदी केलेल्या औषधांना फुटणार्या वाटा रोखण्यासाठी केंद्राच्या सीजीएसएच व्यवस्थेत ज्या प्रकारे औषधांचे वितरण ऑनलाईन पद्धतीने केले जाते, रुग्णांना कोणती औषधे दिली, किती दिली, याचा संदेश जातो. त्याच पद्धतीचा वापर औषध वितरणासाठी व्हावा. आमदार आणि खासदार निधीतून कार्यकर्त्यांना पोसणारी कामे बंद करून त्या निधीचा वापर आगामी पाच वर्षासाठी कार्यक्षेत्रातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठीचा कायदा करावा. आरोग्य व्यवस्थेवर १० टक्के खर्च केला तरच अन्य विकास कामांसाठी निधी देण्याचा कायदा केला जावा. सरकारी आरोग्य व्यवस्थेवरील निधीची नागरिकांना माहिती मिळेल, यासाठी सरकारी संकेतस्थळ तयार करावे. प्रशासन आणि राजकीय नेत्यांना चटके बसले की आरोग्य व्यवस्था निश्चितच सक्षम होईल, असे मत या पत्रात सुधीर दाणी यांनी नमूद केले आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी आपण अलर्ट सिटीझन फोरमच्या माध्यमातून लोकायुक्तांकडे अर्ज केलेला आहे. यावर निश्चितच लवकरच सुनावणी होऊन या व्यवस्थेला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

दैनिक मराठवाडा पत्र

बीड विशेष

• गुरुवार,दि.२९ फेब्रुवारी २०२४ • पान ४

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेतर्फे पीक कर्जधारकांना व्याज सवलतीचा लाभ



बीड -राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत २०२३-२४ या आर्थिक वर्षात पिककर्जाची नियमित परतफेड करणार्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ०१ लाख ९६ हजार ६९६ पिककर्जधारक शेतकर्यांच्या खात्यावर व्याज सवलतीपोटी ४३ कोटी ०२ हजार ६१४ रुपयांचा लाभ जमा करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष श्री. मिलिंद घारड यांनी सोमवारी एका पत्रकार परिषदेत दिली. त्यामध्ये महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय, बीड च्या कार्यक्षेत्रात येणार्या एकूण ५१ शाखांमधील तब्बल ४२२७८ पीककर्जधारक शेतकर्यांना शासनामार्फत प्राप्त झालेल्या रु.०८ कोटी ३२ लाख १९ हजार ७२५ रुपयांच्या व्याज सवलतीच्या रक्कमेचा लाभ लवकरच बँकेमार्फत दिला जाणार आहे. याबाबतची अधिकृत माहिती बँकेच्या बीड क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय व्यवस्थापक राजेंद्र कुरमुडा यांनी बुधवारी दिली. त्यासोबतच आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये वाटप केलेल्या पीककर्जासाठी राज्य शासनाकडून मिळणार्या ०१% व्याज सवलतीपोटी बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या एकूण ७५६३२ पीककर्ज धारक शेतकर्यांच्या खात्यांवर एकूण रु.४१३५३०३४/- इतका लाभ जमा करण्यात आलेला आहे. तीन लक्ष रुपयापर्यंतच्या पिककर्जाची नियमित परतफेड करणारे शेतकरी डॉ. पंजाबराव देशमुख योजनेंतर्गत ०३%, केंद्र शासनामार्फत ०३% आणि राज्य शासनामार्फत ०१% व्याज परताव्यासाठी पात्र होत असतात व अशा प्रकारे पात्र शेतकर्यांना शून्य टक्के व्याजदराने पीककर्जाचा लाभ मिळत असतो.

## न्यू. हायस्कूल शाळेमध्ये विज्ञान दिन साजरा

गेवराई - न्यू. हायस्कूल गेवराई शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन डॉ.सी.व्ही रामण यांना या दिवसी भौतिक शास्त्रामध्ये लावलेल्या शोधाला रामण इफेक्ट असे नाव देण्यात आले. त्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ भारतात २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांचे संपूर्ण नाव चंद्रशेखर वेंकट रामन हे होते त्यांना १९३० साली. भौतिक शास्त्राचे नोबेल पारितोषक मिळाले. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना डॉ.सी.व्ही रामण भौतिक शास्त्रामध्ये केलेले कार्य विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेमध्ये वाढ करतील त्यातूनच विद्यार्थी संशोधण करण्याचे धडे मिळती. डॉ सी.व्ही रामण यांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम भाषण केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री. अहंकारे आर.एन प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे पर्यवेक्षक श्री डांगरे एस.के शाळेचे मुख्याध्यापक श्री.तौर ए.टी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी श्रीमती.नवले मॅडम याने विद्यार्थ्यांना विज्ञानाचे दृष्टिकोन याविषयी महत्व सांगितले. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

## मूकबधिर विद्यालयास विजेतेपद

अंबाजोगाई - नुकत्याच बीड येथे दिव्यांगासठी झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत अंबाजोगाई येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मानव विकास मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले नैपुण्य दाखवत सर्वसाधारण विजेतेपद मिळवले आहे. बीड जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गात मानव विकास मूकबधिर विद्यालयास सर्व साधारण विजेतेपद प्राप्त झाले असल्याची माहिती विद्यालयाच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद केली आहे. जिल्हा स्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद बीड व ग्रामीण विकास महिला बहुउददेशीय सेवाभावी संस्था नाथापूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकूल बीड येथे नुकत्याच संपन्न झाल्या. जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मानव विकास मूकबधिर विद्यालयातील उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मूकबधिर प्रवर्गात जिल्हास्तरीय सर्व साधारण विजेतेपद पटकावले. ेक यांनी तृतीय क्रमांक पटकावला. घवघवीत यश संपादन करीत मूकबधिर प्रवर्गात जिल्हास्तरी दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले.





# बीड जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यात सवलती लागू

**बीड । प्रतिनिधी**

जून ते संप्टेंबर २०२३ या कालावधीतील पर्जन्याची तुट, उपलब्ध असलेल्या भुजलाची कमतरता, दुरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदु आद्रता, पेरणीखालील क्षेत्र व पिकांची परिस्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांमध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेवून बीड जिल्हयातील वडवणी, धारूर व अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये गंभीर स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करून दुष्काळ घोषीत करण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये पुढील सवलती लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

जमीन महसुलात सुट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलाते ३३.५% सूट, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता,आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंड़ीत न करणे, सदर तालुक्यातील खातेदारांना कृषी विषयक मदतीसाठी निविष्ठा अनुदान अनुज्ञेय राहील. बीड जिल्हयातील बीड, गेवराई, शिरूर, माजलगाव, केज, परळी, आष्टी, पाटोदा या



तालुक्यातील महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहीर करुन पुढील सवलती लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. जमीन महसूल खटला, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात १३.५% सूट, शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयों अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टॅकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे. बीड जिल्हयातील वडवणी, धारूर व अंबाजोगाई या गंभीर स्वरुपाचा दुष्काळ जाहीर केलेल्या व दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहीर केलेल्या बीड, गेवराई शिरूर,माजलगाव, केज,परळी, आष्टी, पाटोदा या तालुक्यांमध्ये वरीलप्रमाणे सवलती लागू करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने गंभीर स्वरुपाचा दुष्काळ व, दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये शासन निर्णय अन्वये दिलेल्या निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही अनुसरावी व जाहीर केलेल्या सवलतींच्या अनुषंगाने तात्काळ आवश्यक उपाययोजना राबवाव्यात तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा, असे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांनी केले आहे.

## महासंस्कृती महोत्सवात स्थानिक लोक कलावंतांच्या कलेचे सादरीकरण

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची हास्ययात्रा या लोकप्रिय हास्य प्रसहन कार्यक्रमाला बीडकरांनी उत्स्फूर्त प्रसिद्ध प्रतिसाद दिला एवढेच नव्हे तर पावसातही कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद लुटला. महासंस्कृती अंतर्गत आज चौथ्या दिवशी महाराष्ट्राची हास्ययात्रा आणि स्थानिक लोक कलावंतांच्या कलेच सादरीकरण झाले. यासह मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पोवाडा आणि माहितीपर कार्यक्रम झाला. महाराष्ट्राची हास्य यात्रा कार्यक्रमात कलाकारांनी सादर केलेल्या विनोदावर बीडकर हसून हसून लोटपोट झाले. हा कार्यक्रम सुप्रसिद्ध हास्य कलाकार प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, वनिता खरात , शिवाजी परब, पृथ्वीक प्रताप, प्रभाकर मोरे, दत्तू मोरे, स्वप्निल गोडबोले, श्वेता दांडेराव, आणि अमीर हाडकर यांचासहभाग होता. तर स्वप्नील गोडबोले यांनी 'मन उधाण वाऱ्याचे.' व 'हे माय भवानी.' गाणे सादर केले. हास्ययात्रा हा कार्यक्रम सादर होत असताना पावसाने पण हजेरी लावली. यावेळी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी प्रेक्षकांना थांबण्यासाठी रेन डान्सचा मोफत



आनंद लुटण्याची सूचना केली. यावरही प्रेक्षकांनी टाळ्यांनी प्रतिसाद दिला. छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील महासंस्कृती महोत्सवास जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे, यांची प्रमुख उपस्थिती होती. समता कलापथकातील शाहीर सुरेश रंजवे यांनी सादर केलेल्या तिला फिरवीन माझ्या गाडीवर या गाण्याला प्रेक्षकांनी विशेष प्रतिसाद देत डोक्यावर घेतले. तर इतर स्थानिक लोक कलावंतांकडून पोवाडा, शाहिरी, लावणी, मोर नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. कलाश्री डान्स अकॅडमी बीड यांनी महाराष्ट्राची लोकप्रिय लावणी या नृत्याचा अविष्कार सादर केला. मराठी भाषा दिनानिमित्त कु.सई जाधव या चिमुकलीने करू प्रथम तुला वंदना.. हे गीत म्हटले. तर गातो गुणगान मराठीचे हे गीतही सादर करण्यात आहे. तसेच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्र. जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे निमसरकर यांनी कवी कुसुमाग्रज यांच्याविषयी व्याख्यानातून सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. यावेळी कु. जिगिशा चौरे या चिमुकलीने कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला. या काव्य पंक्तीचे वाचन केले. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महासंस्कृती महोत्सव सुरू उद्या या कार्यक्रमाचा पाचवा दिवस आहे. इथे असलेल्या बचत गटाला त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना अधिकाधिक बिडकर यांनी प्रतिसाद द्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे अखेर महामार्गाची दुरूस्ती

**बीड । प्रतिनिधी**

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावरून लिंबागणेश गावांमध्ये प्रवेश करताना मुख्य प्रवेशद्वार याठिकाणी एचसीपीएल कन्स्ट्रक्शन द्वारा करण्यात आलेले काम सदोष असल्याने मोठा चढ करण्यात आलेला असल्याने याठिकाणी लहान चारचाकी,तिनचाकी तसेच दुचाकी वाहनांना अडचण येत असुन लहान चारचाकी वाहनांचे इंजिन घासत असे तर आठवडी बाजारात येणाऱ्या तिनचाकी वाहनांना धक्का मारावा लागत असे तसेच दुचाकी वाहनस्वार गाडीवरून पडत असत त्यामुळे याठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढल्याने तातडीने चढाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी केल्यानंतर एचसीपीएल कंपनीने वरिष्ठांची दिशाभूल केल्याने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ( मर्या) संभाजीनगर यांनी गावांमध्ये प्रवेश करणारा हा रस्ता या कार्यालयाच्या अख्त्यारीत येत नसुन फक्त नालीचे काम आपल्या विभागाकडून करण्यात आले आलेले आहे. रस्ता हा राज्यशासन किंवा ग्रामपंचायत यांच्या अख्त्यारीत येत असल्याने त्यांची दुरुस्ती सदर विभागाकडून शेवटी काल रात्री एचसीपीएल कन्स्ट्रक्शन मार्फत या रस्ता कामाची दुरुस्ती करण्यात आली.

## कॉमेडी कलापथाच्या आयोजनाने नागरिक मंत्रमुग्ध

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील चौफळदरा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची २८५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. बीड-परळी हायवे पासून चौफळदरा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेची भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती, या मिरवणुकीत हजारो माता भगिनींनी सहभागी झाल्या होऊन संत सेवालाल महाराज यांच्या नावाचा जयघोषाने तांडा दुमदुमून गेला होता.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वडवणी पोलिस ठाण्याचे पीएसआय आर.डी.राठोड व पीएसआय संदीप राठोड यांच्या शुभहस्ते जगद्गुरू सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.व नंतर कॉमेडी कलापथ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ईशान चव्हाण(गीतांजलीबाई) सांस्कृतिक कलापथ नांदेड यांचा कॉमेडी कलापथ या कार्यक्रमाच्या आयोजनाने मंत्रमुग्ध केले होते.यावेळी महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे आयोजन चौफाळदरा तांडा व शेरी बोरखडी तांडा यांनी केले होते.या कार्यक्रमास पारंपरिक पद्धतीने बंजारा नृत्य सादर करण्यात आले.

## १ मार्च रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास,रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र बीड मार्फत दिनांक ०१ मार्च २०२४ रोजी बीड पंडित दिनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळावा-८ चे आयोजन करण्यात आलेले आहे.

या मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित आस्थापनाच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी या करिता ऑनलाईन मुलाखती घेण्यात येणार आहेत.एल.आय.सी बीड येथे एल.आय.सी.एजंट- या पदाची एकुण पदे ५० शैक्षणिक पात्रता- १० वी पास वयोमर्यादा-१८ ते ३५ जॉब लोकेशन- बीड अमर टायर्स् बीड येथे व्हील लॉयमेंट टेक्निशिअन - या पदाची एकुण पदे ०५ शैक्षणिक पात्रता- १० वी पास वयोमर्यादा-१८ ते ३५ जॉब लोकेशन- बीड रोजगार मेळाव्यात सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी पुढीलप्रमाणे सहभागी व्हावे सर्वप्रथम नोकरी इच्छुक उमेदवारांनी वेबसाईटवर नोकरी साधक गेल िशशज्ञशी म्हणून नोंदणी करुन आपल्या युजरनेम व पासवर्डचा वापर करुन डेसळप बटनावर क्लिक करावे. प्रोफाईल मधील पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळावा-८ या लिंक वर क्लिक करुन रोजगार मेळाव्याचा बीड जिल्हा निवडून ऋळश्रींशी बटनावर क्लिक करावे.. त्यातील रलींळेप या पर्यायाखालील दोन बटना पैकी पहिल्या बटनावर क्लिक केल्यास मेळाव्याची माहिती दिसेल तर दुसऱ्या बटनावर क्लिक केल्यास मेळाव्यात रिक्त पदे दिसतील. दुसऱ्या बटनावर क्लिक केल्यानंतर एक संदेश येईल. सदर संदेश काळजीपुर्वक वाचा व ख रसीशश बटनावर क्लिक करावे.आपल्याला शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, आवश्यक कौशल्य व अनुभव या नुसार पदाची निवड करावी लागेल व रश्रिू बटनावर क्लिक करावे.

आपल्याला एक संदेश दिसेल सदर संदेश काळजीपुर्वक वाचा व ओके बटनावर क्लिक करावे. आपला रोजगार मेळाव्यामध्ये ऑनलाईन सहभाग नोंदवला जाईल.याबाबत बीड जिल्हयातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी ऑनलाईन अप्लाय करावे या बाबत काही अडचणी असल्यास या कार्यालयाचा दुरध्वनी कं.०२४४२-२९९११६ , श्री.इंगोले ९८२२७८१८७६ , श्री. यादव यांना ८२०८३६९८९० या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच इशशव डज्ञळश्रश्र या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त, सुशिल उचले, बीड यांनी केले आहे.

## जैन दिवाकर शिक्षण संस्थेवर पुनश्च नितीन कोटेचा यांचे गटाचे वर्चस्व

**बीड । प्रतिनिधी**

जैन दिवाकर शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेच्या तीन रिक्त झालेल्या विश्वस्त पदाची व कार्यकारणी मंडळाच्या २० संचालकाची निवड २५ षशलरोजी संस्थेच्या सभागृहामध्ये दुपारी तीन वाजता कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्रकाशचंद्र कोटेचा यांच्या अध्यक्ष ते खाली दुपारी तीन वाजता संपन्न झाली. या सभेमध्ये मतदानासाठी पात्र असणाऱ्या ३७३ सभासदांपैकी तीनशेच्या वर सभासद उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला संस्थेच्या मयत सभासदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर संस्थेचे विश्वस्त डॉक्टर पोपटलालजी लुणावत यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला. पूर्वी मयत असलेले दोन ट्रस्ट व राजीनामा दिलेले एक ट्रस्टी अशाप्रकारे तीन नवीन ट्रस्टची निवड या सभेमध्ये उपस्थित सभासदांनी हात वर करून बहुमताने केली. नवीन निवड झालेले विश्वस्त. श्री विजयकुमारजी उर्फ बाबुशेठ खिंवसरा मोरगावकर,श्री प्रकाशचंदजी पन्नालालजी कोटेचा, पालिकर श्री शरदचंद्रजी माणिकचंदजी लोढा आर्वीकर यापूर्वीचे दोन ट्रस्टी=ऋ४ श्री नितीनचंद्र माणिकचंद कोटेचा विश्वस्त व संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ५ ड. रतिलाल भगवानदास भंडारी या सभेत कार्यकारणी मंडळाचे २० संचालकाची निवड झाली त्यांची नावे खालील प्रमाणे. श्री सुनील फुलचंदजी दोडीया श्री प्रेमचंदजी



लखीचंदजी बोरा श्री सुशील हिरालालजीअब्बड श्री पृथ्वीराजजी प्रेमराजी अब्बड, श्री मनोज शांतीलालजी छाजेड, श्री अशोकजी जगन्नाथजी लुणावत, श्री गणेशजी पगारिया, श्री अभयजी छाजेड श्री अभिजीत खिंवसरा, श्री संपतलालजी खांटेर, श्री प्रवीणजी बोरा , श्री सुशीलजी सुराणा, श्री पूनमजी नहार, श्री प्रकाशजी बुरड, श्री सुशीलजी खटोड, श्री जितेंद्रजी लोढा, श्री राजेश दोडिया, श्री किरण सोळंकी, सौ साधना अभयजी कोटेचा, सौ पदमा दिलीपजी नहार. आता पुढील मीटिंगमध्ये या वीस संचालकातून ✻पाच✻ प्रमुख पदाधिकारी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष, ची घटनेप्रमाणे निवड करण्यात येईल. नवीन कार्यकारणी मध्ये अनुभवी, मध्यम व युवक अशा तिन्ही स्तरावरील सभासदांना संस्थेवर काम करण्याची संधी देण्यात आलेली आहे. सभा खेळीमेळीच्या व शांततेच्या वातावरणात संपन्न झाली. सभेमध्ये सभासदांनी विचारण्यात आलेल्या प्रश्नांची समर्थक उत्तरे अध्यक्ष प्रकाशजी कोटेचा सचिव सुनील दोडिया, सहसचिव सुशीलजी अब्बड, यांनी दिली. आभार प्रदर्शन उपाध्यक्ष प्रेमचंदजी बोरा यांनी केले. नवीन विश्वस्त विजयकुमारजी खिंवसरा यांनी शेवटी मंगलपाठ दिला. व उपस्थितांना संस्थेतर्फे चहापाणी देण्यात आले. या सभेला वेळेत वेळ काढून बीड व बाहेरगाव हुन आलेल्या सर्व सभासद, महिला सभासदाना, संस्थेतर्फे धन्यवाद.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com